# पू. भार्गवराम यांना ‘संत’ घोषित करण्याचा आनंददायी सोहळा

## मनोगत

‘पू. भार्गवराम प्रभु यांच्या जन्मापूर्वीपासूनच अन्य संतांना त्यांच्यातील संतत्वाची ओळख झाल्याच्या अनुभूती आणि मिळालेल्या पूर्वसूचना सनातनचा ग्रंथ ‘पू. भार्गवराम यांच्या जन्मापासूनच त्यांच्या संतत्वाची झालेली ओळख’ या पहिल्या खंडात दिल्या आहेत. काळानुसार त्यांच्यातील संतत्वाची देवाने समष्टीला ओळख करून दिली आहे. या ग्रंथात त्यांच्यातील संतत्व घोषित करण्यापूर्वी आणि केल्यानंतर साधकांना आलेल्या अनुभूती, तसेच पू. भार्गवराम यांची काही छायाचित्रे दिली आहेत. भगवान श्रीकृष्णाप्रमाणेच पू. भार्गवराम यांच्याकडून भविष्यात होणाऱ्या दैवी कार्याची ओळख मी येथे थोडक्यात देत आहे.

**१. पू. भार्गवराम प्रभु यांचे भावी कार्य :** आपत्काळात साधकांना मार्गदर्शन आणि त्यांचे रक्षण करणे एवढेच या बाळाचे कार्य नाही, तर जगात सर्वत्र ईश्वरी राज्याची घडी बसवण्याचे कार्यही हेच बाळ करणार आहे. या उदाहरणावरून ‘ईश्वर अवतार घेऊन कार्य कसे करतो’, हेही थोडेफार कळते.

**२. पू. भार्गवराममुळे पुढच्याच्या पुढच्या पिढ्यांची काळजी न उरणे :** वर्ष २०२३ मध्ये ईश्वरी राज्याची स्थापना होणार आहे. हे ईश्वरी राज्य चालवण्यासाठी भाव, तळमळ, त्याग, प्रेमभाव, प्रगल्भ विचार आणि देवाप्रती ओढ यांच्यासह राष्ट्रभक्ती इत्यादी गुण इत्यादी गुण असलेले उच्च लोकांतील सात्त्विक जीव साधनेसाठी पृथ्वीवर येत आहेत. आतापर्यंत (३१ मार्च २०१९ पर्यंत) उच्च स्वर्गलोकातून ७५० आणि महर्लोकातून १७० दैवी बालके पृथ्वीवर जन्माला आली आहेत. आतापर्यंत ८७ साधकांनी संत, सद्गुरु आणि परात्पर गुरु पदे प्राप्त केली आहेत. यांमध्ये अनेक दांपत्यांनीही संतपद प्राप्त केले आहे. तसे एक सहस्रहून अधिक साधक संत बनण्याच्या मार्गावर आहेत. त्याचबरोबर आता पू. भार्गवरामसारखे संतही जन्माला येत आहेत. त्यांच्यामुळे मला पुढच्याच्या पुढच्या पिढीची काळजी नाही. एवढेच नव्हे, तर त्यांच्यामुळे त्यांच्या पुढच्या पिढ्यांचीही काळजी वाटत नाही.

**३. दैवी बालके आणि शिशूसंत पू. भार्गवराम प्रभु यांच्यामुळे झालेला व्यक्तीगत लाभ :** दैवी बालके आणि शिशूसंत भार्गवराम प्रभु यांच्यामुळे 'मी साधकांना सिद्ध (तयार) केले', हा अहंभाव माझ्यात निर्माण होऊ शकला नाही; कारण त्यांना मी काहीच शिकवलेले नाही. माझ्यात 'अहं का नाही', याचे उत्तर दैवी बालके आणि शिशूसंत यांच्यामुळे मला मिळाले.

कलियुगांतर्गत सत्ययुगाचा आरंभ करणाऱ्या या बालकाच्या चरणी सर्व साधकांच्या वतीने मी कृतज्ञता व्यक्त करतो !'

**– (परात्पर गुरु) डॉ. आठवले** (७.९.२०१८) F (DW-SStBa-Bha + PR 42Ch-SStBa-Bha-So)

### सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !

मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे; मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे आणि ग्रंथांची संरचना 'इन्‌डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे, या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा – (०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com


### अक्षर सुंदर व सात्त्विक बनवण्यासाठी उपयुक्त सनातनचा ग्रंथ !

## सात्त्विक देवनागरी अक्षरे आणि अंक लिहिण्याची पद्धत

### (देवनागरी अक्षरे म्हणजे संस्कृत, मराठी अन् हिंदी अक्षरे)




हस्ताक्षर सुंदर असण्यासह सात्त्विकही असल्यास लिहिणारा आणि ते लिखाण वाचणारा यांना त्या लिखाणातून चैतन्य मिळते. यासाठी सात्त्विक अक्षरे कशी काढावीत, हे प्रस्तुत ग्रंथात दिले आहे. तसेच ग्रंथातील धर्मशिक्षण देणारे अक्षरांशी निगडित शब्द अन् शब्दांशी निगडित वाक्ये यांचाही लाभ घ्या !

## अनुक्रमणिका

१. चि. भार्गवराम प्रभु यांच्या सन्मान-सोहळ्याच्या पूर्वसिद्धतेसाठी मंगळूरू येथे जातांना साधकांना आलेल्या अनुभूती १२

२. साधकांना मिळालेल्या चि. भार्गवरामच्या आध्यात्मिक प्रगतीच्या पूर्वसूचना १४

३. सन्मान-सोहळ्यापूर्वी साधकांना झालेले त्रास २२

४. दीपावलीच्या शुभमुहुर्तावर अशी झाली चि. भार्गवराम यांच्या संतपदाची विश्वाच्या इतिहासातील अद्वितीय घोषणा ! २२

५. चि. भार्गवराम यांना संत म्हणून घोषित केल्यावर साधकांची झालेली विचारप्रक्रिया २८

६. साधकांना आलेल्या चांगल्या, तसेच वाईट शक्तींचा त्रास असणाऱ्या साधकांना आलेल्या त्रासदायक अनुभूती ४४

७. पू. भार्गवराम यांच्या सन्मान सोहळ्याच्या वेळी साधकांनी केलेले सूक्ष्म परीक्षण ५७

८. सन्मान-सोहळ्यानंतर पू. भार्गवराम यांचे मुख उघडे असलेले श्रीकृष्णाच्या वेशातील छायाचित्र पाहिल्यावर साधकांना आलेल्या अनुभूती आणि केलेले सूक्ष्म परीक्षण ६६

९. सन्मान सोहळ्यानंतर पू. (चि.) भार्गवराम यांच्या अस्तित्वाने साधिकेवर आध्यात्मिक उपाय झाल्यानंतर तिला झालेले त्रास ७०

१०. संतांनी अनुभवलेला पू. भार्गवराम यांच्या सन्मान सोहळ्याचा आनंद ७०

११. भार्गवराम यांच्या रूपात बालसंत दिल्याविषयी साधकांनी व्यक्त केलेली कृतज्ञता ८४

१२. दैनिक सनातन प्रभातच्या ‘पू. भार्गवराम’ विशेषांकातील त्यांची छायाचित्रे पाहून अनुभवलेला निखळ आनंद ८६